पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय,
क्रमांक-नस/७/कावि/६४९/२०१२
दिनांक- २/०८/२०१२

प्रति,
मा. ....................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-४११ ०१८.

विषय- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा दिनांक ७.८.२०१२ रोजी आयोजित केलेबाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ७.८.२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत:- १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती
<u>कार्यपत्रिका क्रमांक- १८</u>

दिनांक- ७.८.२०१२ वेळ- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहीक सभा मंगळवार, दिनांक ७/८/२०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

दिनांक ३१/७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १७) सभावृत्तांत कायम करणे.

विषय क्रमांक- १) मनपाच्या वाय.सी.एम.रूग्णालयाच्या लॉण्ड्री विभागातील उपकरणे / मशिनरीचा वापर करून लिनन (कपडे) धुलाईकामी निविदा प्रक्रियेचे कार्यवाही अंतिम टप्प्यात आली असून लवकरचा ई-निविदा नोटीस प्रसिध्द करण्यात येणार असल्यामुळे मे.सारा ट्रेडर्स प्रा.लि. यांनी केलेल्या विनंतीनुसार त्यांना दिनांक ३१/८/२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यास व येणारे अंदाजे प्रतिमहा र.रू.९५,०००/- [र.रू.पंच्यान्नव हजार] अथवा प्रत्यक्ष येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
(दिनांक ७.८.२०१२ चे सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक- २) मे.Tech ९ Services यांना Content Management Cell करिताचे कामकाजाकरिता आदेशाचे तारखेपासून पुढील एक वर्ष कालावधीकरिता (दि.७/३/२०१२ ते ६/३/२०१३) र.रू. १,९३,५००/- इतक्या रकमेचे कामकाजाचे आदेश देण्यात आलेले असलेने सदरच्या कामकाजास व येणाऱ्या वार्षिक र.रू. १,९३,५००/- [र.रू.एक लाख त्र्यान्नव हजार पाचशे] चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ३) मनपाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांतील इ.४ थी, ७ वी व इ. ९ वी, १० वी च्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती परीक्षेबाबत विशेष मार्गदर्शन करणेकामी दि.३०/७/२०१२ रोजी शिक्षक प्रशिक्षण

आयोजित करणेकामी आगाऊ र.रू.४२,०००/- [र.रू.बेचाळीस हजार] शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग श्री.जाधव

विष्णू श्रीधर यांचे नावाने अदा करणेस तसेच सदरचा उत्तुंग आमुचे ध्येय या प्रोजेक्टच्या वर्षभराच्या एकूण अंदाजे खर्च र.रू. १५,१०,०००/- च्या खर्चास, तसेच सदरच्या प्रोजेक्टकरीता वेळोवेळी लागणाऱ्या आगाऊ रक्कमा अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ४) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३/२०१२-१३ मधील अ.क्र.८६ अन्वये, वॉर्ड क्र.१२ चऱ्होली येथील स्मशानभुमी जवळ घाट बांधणेकामी मे.एस.बी.सवई (नि.र.रू.३७,१५,३५४/- [र.रू. सदोतीस लाख पंधरा हजार तीनशे चोपन्न] पेक्षा ११.१२ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा दर मंजुर दराने र.रू. ३४,६७,३१७/- पर्यंत काम करून घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे डांबर, सिमेंट, लोखंड या तीनही मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसूल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचे बरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण रुग्णालयाचे वापराकरीता मा.गजानन बाबर खासदार निधीमधून जिल्हा शल्य चिकिस्ता रुग्णालय औंध यांचेकडून मिळालेल्या रुग्णवाहीका क्र. MH १४ CW ०५५१ चे देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामे पिंपरी चिंचवड महापालिकेकडून करणेस व त्याकामी येणारे खर्चास तसेच यापुर्वी पोलीस खात्याकडून पिंपरी चिंचवड मनपाकडील अतिक्रमण विभागाचे वापराकरीता मिळालेल्या वाहनांची देखभाल दुरुस्ती कामासाठी, इतर अनुषंगीक कामाकरीता झालेल्या खर्चास तसेच भविष्यात अशा प्रकारच्या वापरामध्ये येणाऱ्या वाहनांच्या तत्सम खर्चास, तसेच भविष्यात मनपाचे वापराकरीता मिळणाऱ्या अशा प्रकारच्या वाहनांचे देखभाल दुरुस्ती व इतर अनुषंगीक कामाकरीता येणारे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक- ६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडील वैद्यकिय विभागाचे वापरीकरिता आवश्यक असलेल्या पाच नग रुग्णवाहिका मे.फोर्स मोटर्स लि. या उत्पादित कंपनीचे अधिकृत विक्रेते

मे.सिद्धार्थ मोटर्स, कासारवाडी, पुणे यांचेकडून निविदा न मागविता करारनामा न करता थेट पद्धतीने प्रति वाहन र.रु.९,१९,२५८/- प्रमाणे पाच वाहनांकरीता र.रु.४५,९६,२९०/- आगाऊ स्वरुपात अदा करुन खरेदी करणेस व येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/७/कावि/६४९/२०१२
दिनांक : ०२/०८/२०१२ चे लगत

टिप : प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस्) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.